**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर,वसई-विरार
पोलीस आयुक्त यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं ०२२- २९४५१००१
**Email ID- pro.cp.mbvv@mahapolice.gov.in**

**प्रेसनोट क्रमांक ३५८** **दिनांक २४-१२-२०२१**

# निर्जन ठिकाणचा गैरफायदा घेवुन पायी चालणा-या इसमांना मारहाण करुन जबरी चोरी करणा-या टोळीस अटक - वालीव पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण शाखेची कामगिरी.

दिनांक - २०/१२/२०२१ रोजी सायंकाळी १८.०० वा चे सुमारास फिर्यादी मोहम्मद साफिद अख्तर हे फोनवरती बोलत कामावरुन पायी घरी जात असतांना चिंचपाडा ब्लुबेल इंडट्रीज पाठीमागे, वालीव, वसई (पुर्व) या निर्जन ठिकाणी पोहचले असता फिर्यादी यांचे पाठीमागुन स्कुटीवरती दोन अनोळखी इसम हे फिर्यादी यांच्या उजव्या बाजुला येवुन थांबले व त्या ठिकाणी अगोदरच थांबलेल्या एका अनोळखी इसमाने फिर्यादी यांचे पाठीमागुन कशानेतरी फिर्यादीचे डोक्यावर जोरात मारुन जखमी करुन त्यांचे हातातील मोबाईल हिसकावुन घेवुन स्कुटीवरती बसुन तीन अनोळखी इसम भरधाव वेगात निघुन पळून गेले. सदर घटनेबाबत तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीवरुन वालीव पोलीस ठाणे येथे I गुरनं १४५५/२०२१ भा.दं.वि.सं कलम ३९४, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

वालीव पोलीस ठाण्याच्या हद्दीत अशाप्रकारच्या दुखापती करुन जबरी चोरीच्या घटना वाढत असल्याने सदर गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेऊन वरिष्ठांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे वालीव पोलीस ठाणेच्या गुन्हे प्रकटिकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी घटनास्थळावरील बारकावे तपासून तांत्रिक विश्लेषण व गुप्त बातमीदाराचे मार्फतीने मिळालेल्या बातमीच्या आधारे सदर गुन्हयातील आरोपीतांचा शोध घेऊन आरोपी क्र. १) अलोक गोरख जयस्वाल ०२) प्रकाश हरिश्चंद्र सरोज यांना अटक करून त्यांचेकडुन ८,०००/- रुपये किंमतीचा ओपो कंपनीचा ए-१६ मोबाईल फोन तसेच गुन्हयात वापरलेले वाहन असे एकूण ४०,०००/- रुपये किमंतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

वरील कामगिरी श्री. संजयकुमार पाटील, पोलीस उप आयुक्त, परीमंडळ-२ वसई, श्री. पंकज शिरसाट सहाय्यक पोलीस आयुक्त, तुळींज विभाग यांचे मार्गदर्शनाखाली वालीव पोलीस ठाणेचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. कैलास बर्वे, श्री. राहुलकुमार पाटील, पोलीस निरीक्षक (गुन्हे), गुन्हे प्रकटिकरण पथकाचे सपोनि/ज्ञानेश फडतरे, पोहवा/मुकेश पवार,पोहवा/ मनोज मोरे, पोना/किरण म्हात्रे, सचिन दोरकर, सतिष गांगुर्डे, राजेंद्र फड, पो.अंम. गजानन गरीबे, सुर्यकांत मुंढे, सचिन खताळ, जयवंत खंडवी, यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.

----ooo----